**दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई**
(दि विदर्भ **को– ऑप.बँक** लि., सम्मिलीत )
(शेडयुल्ड बँक)
सर विठ्ठलदास ठाकरसी स्मृतीभवन, ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, पोस्ट बॉक्स नं.४७२
फोन नं. ९१-०२२-२२८००७४७/२२८७६०१५ ते २०, Website: https://mscbank.com.

## चल व अचल मालमत्ता विक्रीसाठी/भाडेतत्वावर देण्याबाबतची निविदा सुचना

दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप.बँक लिमिटेड मुंबई **"सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेटस ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट २००२"** नुसार कर्जदार संस्थांच्या खालील नमुद मालमत्तेची विक्री/भाडेतत्वावर देणेसाठी मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

कर्जदार व मालमत्तेचा तपशिल खालील प्रमाणे :– विक्री करावयाच्या संस्था (रु.लाखात)

| अ क्र | संस्थेचे नांव | क्षमता | मालमत्ता तपशील | राखीव किंमत (रु.लाखात) | बयाना रक्कम (रु. लाखात) १० % | मालमत्ता पाहण्याची तारीख | निविदा उघडण्याची तारीख | येणेबाकी ३०.०९.२०२० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | जयकिसान ससाका लि., बोधेगांव, ता. दारव्हा, जि. यवतमाळ | २५०० टन प्रति दिन | लॉट – अ<br>जमीन ४७.४९ हे.आर.व इमारत | ११६७.०३ | ११६.७० | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | १६.०३.२१ सकाळी ११.३० वाजता | २२२०६.३९ |
| | | | **लॉट -ब**<br>प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी, स्क्रॅप व स्टोअरमाल | ११२५.०० | ११२.५० | | | |
| | | | एकूण | २२९२.०३ | २२९.२० | | | |
| २ | पांझराकान ससाका लि., भाडणे, ता. साक्री, जि. धुळे | १२५० मे.ट. प्रती. दिन | लॉट – अ<br>जमीन १००.९२ हे.आर.व इमारत | १६२५.०० | १६२.५० | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | १६.०३.२१ दुपारी १२.०० वाजता | ८१५५.८९ |
| | | | **लॉट -ब**<br>प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी, स्क्रॅप व स्टोअरमाल | ६५३.०० | ६५.३० | | | |
| | | | एकूण | २२७८.०० | २२७.८० | | | |
| ३ | स.म.स्व.बापूरावजी देशमुख ससाका. लि., वेळा ता–हिंगणघाट, जि.वर्धा | २५०० मे.ट. प्रती.दिन | लॉट – अ<br>जमीन १८२.९५ एकर व इमारत | २४५१.३६ | २४५.१३ | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | १६.०३.२१ दुपारी १२.३० वाजता | राज्य बँक १२९२२.०६ सहभागातील बँका ३३०५.३२ (३१.१२.२०१८) |
| | | | **लॉट -ब**<br>प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी, स्क्रॅप व स्टोअरमाल | १२२४.५० | १२२.४५ | | | |
| | | | एकूण | ३६७५.८६ | ३६७.५८ | | | |
| ४ | जिजामाता सहकारी साखर कारखाना लि., दुसरबीड, तालुका–सिंदखेड राजा, जिल्हा–बुलढाणा | १२५० मे.ट. प्रती. दिन | लॉट – अ<br>जमीन ७०.८०हे.आर. व इमारत | ४०३१.०७ | ४०३.१० | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | १६.०३.२१ दुपारी ०३.३० वाजता | ७९०५.४१ |
| | | | **लॉट -ब**<br>प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी, स्क्रॅप व स्टोअरमाल | ९३४.५० | ९३.४५ | | | |
| | | | एकूण | ४९६५.५७ | ४९६.५५ | | | |
| ५ | अकोट तालुका सह. सूत गिरणी लि., जोगबन, ता–अकोट, जिल्हा–अकोला | १७२८० स्पिंडल | जमीन २५.१९ हे.आर.व इमारत | १०२२.०० | १०२.२० | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | १६.०३.२१ दुपारी ०१.०० वाजता | ६७२५.७० |
| | | | प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी, स्क्रॅप व स्टोअरमाल | २०२.०० | २०.२० | | | |
| | | | एकूण | १२२४.०९ | १२२.४० | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | तालुका शेतकरी दालमिल प्रक्रिया सह.संस्था मर्या, उदगीर,जि.लातूर | १ टन प्रति तास | इमारत, प्लॅन्ट व मशिनरी आणि जमीन (६९४० चौ.मी.) | १०४.२९ | १०.०० | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | १६.०३.२१ दुपारी ०२.०० वाजता | ४५७.५१ (३०.०९.२०२०) |
| ७ | गंगापूर सहकारी साखर कारखाना लि., रघुनाथनगर, ता–गंगापूर,जि–औरंगाबाद | २००० मे.टन प्रती दिन | जमिन, बिल्डींग, प्लॅन्ट व मशिनरी, डिस्टीलरीसह | ४९४६.८३ | ४९४.६८ | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यत | ३१.०३.२१ दुपारी ११.०० वाजता | ८८०७.२१ |
| | वरीलपैकी लॉट नं.अ व ब एकत्रित घेण्यास प्रथम प्राधान्य | | | | | | | |

| | **भाडयाने देण्याची संस्था :–** | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | संस्थेचे नांव | क्षमता | भाडे रक्कम | मालमत्ता तपशील | राखीव किंमत (रु. लाखात) | बयाना रक्कम (रु. लाखात) | भाडयाची अनामत सुरक्षा रक्कम | भाडे कराराचा कालावधी | मालमत्ता पाहण्याची तारीख | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | ३०.९.२० रोजी येणेबाकी |
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | | | ७ | ८ | ९ |
| ८ | जिजामाता सहकारी साखर कारखाना लि., दुसरबीड, तालुका–सिंदखेड राजा, जिल्हा–बुलढाणा | १२५० मे.ट. प्रती. दिन | प्रथम वर्षी रु.१००.०० लाख द्वितीय वर्षी रु.२००.०० लाख व तिसऱ्या वर्षापासून रु.४००.०० लाख कायम भाडे अधिक टॅगिंग रु.१००/– प्रमाणे प्रतिक्वींटल किमान गाळप २ लाख मे.टन | कारखाना इमारत/ यंत्रसामुग्री व जमीन ७०.८०हे. आर | ---- | ३३.३५ लाख | १००.०० लाख | किमान १५ वर्षे | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | १६.३.२१ दुपारी ०३.३० वाजता | ७९०५.४१ |
| ९ | स.म. दत्ताजीराव कदम सहकारी सूत गिरणी लि., कौलगे, तालुका–गडहिंग्लज, जिल्हा–कोल्हापूर | २५००० चात्या (९६०० उभारणी झालेल्या) चात्या | दरमहा भाडे रु.३.०० लाख व १०% भाडेवाढ प्रति वर्षी | सूत गिरणी इमारत व जमीन (१०.८९ हे.आर.) प्लॅन्ट व मशिनरी | ---- | १०.०० लाख | ९.०० लाख | किमान १५ वर्षे | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | १६.३.२१ दुपारी ०२.३० वाजता | १०४१.९२ |
| १० | जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना लि., नळेगांव, ता–चाकूर, जिल्हा–लातूर | १२५० मे.ट. प्रती. दिन | प्रथम वर्षी रु.१००.०० लाख द्वितीय वर्षी रु.२००.०० लाख व तिसऱ्या वर्षापासून रु.४००.०० लाख कायम भाडे अधिक टॅगिंग रु.१००/– प्रमाणे प्रतिक्वींटल किमान गाळप २ लाख मे.टन | कारखाना इमारत/ यंत्रसामुग्री व जमीन २९१.६७ एकर | --- | ३३.३५ लाख | १००.०० लाख | किमान १५ वर्षे | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | १६.३.२१ दुपारी ०३.०० वाजता | ७८२३.४८ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | महेश (कडा) सहकारी साखर कारखाना लि., कडा, ता–आष्टी, जि–बीड | १२५० मे.ट. प्रती. दिन | प्रथम वर्षी रु.१००.०० लाख द्वितीय वर्षी रु.२००.०० लाख व तिसऱ्या वर्षापासून रु.४००.०० लाख कायम भाडे अधिक टॅगिंग रु.१००/– प्रमाणे प्रतिक्वींटल किमान गाळप २ लाख मे.टन | कारखाना इमारत/ यंत्रसामुग्री व जमीन ७५.५४ हे.आर | –– | ३३.३५ लाख | १००.०० लाख | किमान १५ वर्षे | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | ३१.३.२१ सकाळी ११.३० वाजता | ३२७८.२६ |
| १२ | गंगापूर सहकारी साखर कारखाना लि., रघुनाथनगर, ता–गंगापूर,जि–औरंगाबाद | २००० मे.ट. प्रती. दिन ३० के.एल. पी.डी. | प्रथम वर्षी रु.२००.०० लाख द्वितीय वर्षी रु.३००.०० लाख व तिसऱ्या वर्षापासून पुढे रु.६२५.०० लाख कायम भाडे अधिक टॅगिंग रु.१००/– प्र.मे.टन गाळपावर | जमीन बिल्डींग व प्लॅन्ट मशीनरी डिस्टीलरीसह | –– | ५३.३३ लाख | १६०.०० लाख | किमान १५ वर्षे | ०८.०३.२१ ते ०९.०३.२१ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | ३१.३.२१ सकाळी ११.०० वाजता | ८८०७.२१ |

अ) **<u>विक्री व भाडयासाठीच्या अटी खालील प्रमाणे –</u>**

१. उपरोक्त मालमत्ता ‘जशी आहे आणि जिथे आहे, ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत’ अशा अटीवर व ज्यास कोणतीही हमी, खात्री, बंधन, जबाबदारी वा प्रतिनिधीत्व शिवाय असलेल्या तत्वावर अ.क्र.१ ते ६ विकण्यात येईल व अ.क्र.७ व ८ भाडयानेही देण्यात येईल. चल – अचल मालमत्तेचे क्षेत्रफळ, संख्या इ. बाबत कोणतीही हमी, खात्री, जबाबदारी इ.बाबत प्राधिकृत अधिकारी जबाबदार असणार नाहीत. प्रा.फंड, शासकीय देणी, विज बिल, पाणी बिल, कामगार देणी, इ.वा अन्य वैधानिक देणी (सद्याची व भविष्यात निर्माण होणारी) सर्वदेणी भागविण्याची जबाबदारी अ.क्र.१ ते ४ संस्थांसाठी (प्रोरेटा बेसिसवर) तर अ.क्र.५ ते ७ संस्थांसाठी संपूर्ण खरेदीदाराची राहील. तर भाडे करार कालावधीतील देयतेची जबाबदारी भाडेकरुची राहील.

२. अ.क्र.१ ते ७ संस्थांच्या विक्रीची निविदा राखीव किंमतीपेक्षा तर अ.क्र.८ ते १२ भाडयाची निविदा टेंडर फॉममधील परिशिष्ट क्र.२ मध्ये नमुद भाडे रक्कमेपेक्षा जादा असणे तसेच विनाअट असणे आवश्यक आहे. निविदेत नमूद रक्कम अंतिम समजली जाईल, त्यामध्ये निगोशिएशन होणार नाही. निविदा भरताना ही बाब लक्षात घेणे जरुरीचे आहे. टेंडर उघडण्याच्या दिवशी प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च निविदा भरणाऱ्या निविदाधारकास यशस्वी घोषित करतील. यशस्वी निविदाधारकास मालमत्ता स्वतःच्या नांवावर करुन घेण्यासाठी लागणारा खर्च उदा. मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इ. करावा लागेल. तर भाडे निविदा मा.प्रशासक सभेत अंतिम करणेत येवून निर्णय निविदाधारकास कळविणेत येईल.

३. विक्रीच्या निविदा सोबत १० % बयाणा रक्कमेचा तर भाडयाच्या निविदेसाठी अ.क्र.८साठी रु.३३.३५ लाख तर अ.क्र.९साठी रु.१०.०० लाख तर अ.क्र.१०साठी रु.३३.३५ लाख, अ.क्र.११साठी रु.३३.३५ लाख तर अ.क्र.१२साठी रु.६७.०० लाख रक्कमेचा भरणा बँकेत निविदा सादर करणेपूर्वी आर. टी. जी. एस. द्वारे (RTGS/NEFT: IFSC:MSCI 0082002 A/c No.000211690000010 A/c Name DIRR Head office) दि महाराष्ट्र स्टेट को. ऑप.

बँक लि., मुंबई येथे जमा करणे आवश्यक आहे. अयशस्वी निविदाधारकांना बयाणा रक्कम त्या दिवशी किंवा पुढील दिवशी परत करणेत येईल. बयाणा रक्कमेवर व्याज देण्यात येणार नाही. प्राधिकृत अधिकारी भाडयाची /विक्रीची अंतिम निविदा बँकेच्या मा.प्रशासक सभेत सादर करतील.

४. विक्रीची/भाडयाची निविदा पुस्तिका (बीड डाक्युमेंट) बँकेचे मुख्य कचेरी, मुंबई येथील डीआयआरआर विभागाचे व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय,नागपूर, प्रादेशिक कार्यालय, नाशिक व प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद, प्रादेशिक कार्यालय, नांदेड,प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे अ.क्र.१ ते ६ व अ.क्र.८ ते १० दि.०१.०३.२०२१ ते दि.१५.०३.२०२१ व अ.क्र.७, अ.क्र.११ व अ.क्र.१२ साठी दि.०१.०३.२०२१ ते दि.३०.०३.२०२१ या दरम्यान कार्यालयीन दिवशी (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत मिळतील.

तसेच निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या बेबसाईटवरुनही (Website: https://mscbank.com.) डाऊनलोड करुन भरता येतील. मात्र निविदा बँकेत सादर करणेपूर्वी बँकेत त्यांनी विक्रीच्या बीड डॉक्युमेंटपोटी अ.क्र.१ ते ५ व ७ साठी रु.२९,५००/- (जी.एस.टी.सह) तर अ.क्र.६साठी रु.१७,७००/- (जी.एस.टी.सह) व अ.क्र.७ ते १२भाडयाच्या बीड डॉक्युमेंटपोटी रु.५९००/- (जी.एस.टी.सह) चा एन.ई.एफ.टी.द्वारे भरणे आवश्यक राहिल.

५. अ.क्र.१ ते ४ संस्थांच्या विक्रीच्या इच्छुक निविदाधारक लॉट ‘अ’ किंवा लॉट ‘ब’ किंवा लॉट ‘अ’ व ‘ब’ एकत्रित लॉटसाठी वेगवेगळया निविदा भरु शकतात. प्रत्येक लॉटसाठी स्वतंत्र बयाणा रक्कम भरणा करावयाची आहे. बयाणा रक्कमेचा भरणा निविदेत नमूद खात्यावर आर.टी.जी.एस. व्दारे करावयाचा आहे. लॉट ‘अ’ व ‘ब’ दोन्हीसाठी एकत्रित निविदा भरणाऱ्या निविदाधारकांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

६. विक्री अथवा भाडयासाठी निविदा मागविलेल्या क्र.४ व ७ या संस्थांसाठी विक्री व भाडयासाठीही निविदा मागविण्यात आल्या आहेत. तथापि विक्रीसाठी उच्चतम निविदा प्राप्त झाल्यास त्यास प्राधान्य दिले जाईल.

७. अ.क्र.१ ते ६ व अ.क्र.८ ते १०साठी निविदा दाखल करावयाची अंतिम तारीख दि.१५.०३.२०२१ व अ.क्र.७, अ.क्र.११ व अ.क्र.१२ साठी निविदा दाखल करावयाची अंतिम तारीख दि.३०.०३.२०२१ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत राहील. निविदा मुख्य कचेरी, मुंबई येथे दाखल कराव्यात.

८. विक्री व भाडेतत्वासाठी संबंधित प्राप्त निविदा उघडण्याची तारीख १६.०३.२०२१ रोजी क्र.१ सकाळी ११.३० वाजता, क्र.२ दुपारी १२.०० वाजता, क्र.३ दुपारी १२.३० वाजता,क्र.५ दुपारी ०१.०० वाजता, क्र.६ दुपारी ०२.०० वाजता, क्र.९ दुपारी २.३० वाजता, क्र.१० दुपारी ०३.०० वाजता व क्र.४ व क्र.८ दुपारी ०३.३० वाजता

विक्री व भाडेतत्वासाठी संबंधित प्राप्त निविदा उघडण्याची तारीख ३१.०३.२०२१ रोजी क्र.७ व क्र.१२ सकाळी ११.०० वाजता, क्र.११ सकाळी ११.३० वाजता,

मुख्य कचेरी, दुसरा मजला, सर विठ्ठलदास ठाकरसी स्मृतीभवन ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई ४०० ००१, येथे उघडण्यात येतील.

९. मालमत्ता भाडयाने देणे/विक्री करण्याचे अधिकारी सरफेसी कायदा-२००२ अंतर्गत प्राधिकृत अधिकारी यांना प्राप्त आहेत. त्यानुसार योग्य ते कारण देवून कोणतीही निविदा स्विकारण्याचा/ रद्दबादल ठरविण्याचे संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांना राहिल.

१०.अ.क्र.८ ते १२ मधील भाडेतत्वावरच्या यशस्वी निविदाधारकास भाडेकरार करणे, मुद्रांक शुल्क भरणे तसेच करार नोंदणीचा सर्व खर्च करावा लागेल.

११.प्रत्येक संस्थेच्या विक्री/भाडे मालमत्तेच्या निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या (Website: https://mscbank.com.) वेबसाईटवरही अ.क्र.१ ते ६ व ८ ते १०साठी दि.०१.०३.२०२१ ते दि.१५.०३.२०२१ पर्यंत तर अ.क्र.७, अ.क्र.११ व अ.क्र.१२ दि.०१.०३.२०२१ ते दि.३०.०३.२०२१ पर्यंत उपलब्ध राहील. (यातील अटी/शर्ती विक्रीस /भाडेतत्वाच्या निविदेस लागू राहतील.)

१२.उपरोक्त माहितीतील मुद्दे, अटी, शर्तीच्या स्पष्टतेसाठी बँकेच्या (Website: https://mscbank.com.) वेबसाईटवर आणि दै.लोकसत्ता व दैनिक फायनान्सियल एक्स्प्रेसमध्ये बँकेने दि.०१.०३.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीतील माहितीचा आधार घ्यावा व तो अंतिम राहील.

१३.इच्छुक निविदाधारक दि.०८.०३.२०२१ व दि.०९.०३.२०२१ या दिवशी कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत संस्था स्थळी भेट देवून मालमत्तेची पाहणी करु शकतात.

१४.सर्व इच्छुक विक्री/ भाडेकरु निविदाधारकांनी ड्यु डिलिजन्स स्वःत करुन घ्यावयाचे आहे. प्राप्त झालेले विक्री/भाडे प्रस्ताव मा.कार्यकारी समिती समोर अंतिम करण्यासाठी ठेवण्यात येतील व याबाबतचा निर्णय निविदाधारकास अलाहिदा कळविण्यात येईल. अ.क्र.८,१० ते १२ साठी वार्षिक कायम भाडे रक्कम अधिक प्रत्यक्ष गाळपातून उत्पादित होणाऱ्या प्रती क्वींटल साखरेवर टॅगिंग प्रमाणे वसुली देण्याचे व अट.क्र.९ साठी दरमहा भाडे परिशिष्ट क्र.२ मध्ये नमूद करुन भाडे करार कालावधीसह निविदा द्याव्यात.

**वैधानिक नोटीस**

कर्जदार आणि जामिनदार यांना सुचित करण्यात येते की, राज्य सहकारी बँक व सहभागातील बँकांच्या एकूण कर्ज येणेबाकीचा भरणा निविदा उघडणेपूर्वी करावा. अन्यथा जप्त मालमत्तेची विक्री करुन कर्ज वसुली केली जाईल. तसेच विक्री प्राप्त रकमेतून संपूर्ण वसुली न झाल्यास उर्वरित कर्जबाकी व्याज व इतर खर्चासह आपणांकडून वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-

( डॉ. अजित देशमुख )

व्यवस्थापकीय संचालक तथा प्राधिकृत अधिकारी

दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक लि., मुंबई

दिनांक :- ०१.०३.२०२१

ठिकाण :- मुंबई